# भारतीय रिझर्व्ह बँक

**www.rbi.org.in**

आरबीआय/2009-10/142

डीबीओडी. क्र. लेज. बीसी. 37/09.07.005/2009 -10 सप्टेंबर 2, 2009

सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका
(आरआरबीज सोडून )

माननीय सर,

**ऑटिझम, सेरीब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन आणि मल्टिपल डिसॅबिलिटिज असणाऱ्या व्यक्तींच्या वेल्फेअर साठीचा नॅशनल ट्रस्ट,ॲक्ट,1999 यांच्या अंतगर्त स्थापिलेल्या लोकल लेव्हल कमिटीज यांच्या संबंधीची माहिती प्रदर्शित करणे.**

कृपया कस्टमर सर्व्हिस वरील 1 जुलै 2009 दिनांकित डीबीओडी. नं. लेज. बीसी.9/ 09.07.006/ 2009-10 या आमच्या मास्टर सर्क्युलरमधील परिच्छेद 11 पहा, ज्यात बँकांना असा सल्ला देण्यात आलेला आहे की त्यांनी मेंटल हेल्थ ॲक्ट 1987 च्या खाली जिल्हा न्यायालयाने दिलेले किंवा ऑटिझम, सेरीब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन आणि मल्टि्पल डिसॅबिलिटीज असणाऱ्या व्यक्तींच्या वेल्फेअरसाठीचा नॅशनल ट्रस्ट ॲक्ट,1999 (यानंतर याचा उल्लेख मेंटल डिसॅबिलिटिज ॲक्ट असा केला जाईल)च्या अंर्तगर लोकल लेवल कमिटीजने दिलेले गार्डियनशिप सर्टिफिकेट,ॲक्टच्या खाली येणाऱ्या अपंग व्यक्तींच्या कायदेशीर पालकांकडून बँक खाती उघडणे/बँकींग व्यवहार करणे यासाठी, वैध धरावे. बँकांना असासुद्धा सल्ला दिला आहे की त्यांनी त्यांच्या शाखा अपंग व्यक्तीच्या पालकांना/नातेवाईकांना योग्य मार्गदर्शन करतात, ज्यायोगे त्यांना यासंबंधात कोणतीही अडचण येत नाही, याची निश्चिती करावी.

2. दिल्ली उच्च न्यायालयासमोर आलेल्या एका प्रकरणी माननीय न्यायमूर्तींनी सर्व बँकांना असा आदेश दिला आहे की त्यांच्या शाखांनी ठळक जागी खालील माहिती प्रदर्शित करावी (i) कायद्याच्या (मेंटल डिसऑबिलिटि ॲक्ट )अंतर्गत मिळणाऱ्या सुविधांचे आवश्यक तपशील (ii) ही गोष्ट की प्रमाणपत्र मिळविण्यासाठी संबंधित व्यक्ती लोकल लेवल कमिटीजकडे जाऊ शकतात आणि मेंटल डिसॅबिलिटिज ॲक्टच्या खाली दिलेले प्रमाणपत्र स्वीकारले जाते, आणि (iii)त्या भागातील लोकल लेव्हल कमिटीजची माहिती. न्यायालयाने आणखी असा आदेश दिला की ही माहिती स्थानिक भाषा आणि इंग्रजी / हिंदी (किंवा दोन्ही ) भाषांमध्ये प्रदर्शित करावी.

---

**बँकिंग ऑपरेशन्स आणि डेव्हलपमेंट खाते, सेंट्रल ऑफिस, 12 वा मजला ,**
**सेंट्रल ऑफिस बिल्डिंग, शाहिद भगतसिंग मार्ग, मुंबई -400 001 ई- मेल :** cgmicdbodco.org.in

3.बँकांना असा सल्ला देण्यात येतो की त्यांनी न्यायालयाच्या वरील आदेशांचे काटेकोर पालन करावे. बँकांना हासुद्धा सल्ला दिला जातो की त्यांनी मेंटल डिसॅबिलिटिज ॲक्टच्या तरतुदींचे काटेकोर पालन करावे. ही नोंद घ्यावी की ऑटिझम, सेरीब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन आणि मल्टिपल डिसॅबिलिटीज असलेल्या व्यक्तींच्या वेल्फेअरसाठीच्या नॅशनल ट्रस्टच्या www.thenationaltrust.in या वेबसाइटवर लोकल लेव्हल कमिटीजचे तपशील उपलब्ध आहेत.

तुमचा,

( बी. महापात्रा )
मुख्य महाव्यवस्थापक